# स्त्री-चळवळींसंबंधी दृष्टिकोन : प्रश्न आणि संबंध

(मूळ लेख इंग्रजीत आहे.)

डॉ. विभूती पटेल

('स्त्री-मुक्ती चळवळीची सध्याची स्थिती आणि दिशा' या विषयावरील ३१ मार्च १९९१ रोजी सुमतीबाई सरदार स्त्रीमुक्ती प्रतिष्ठानतर्फे झालेल्या चर्चासत्रासाठी लिहिलेला लेख)

'आम्ही लढतो आहोत समानतेसाठी'
'आम्ही लढतो आहोत सन्मानासाठी'
'आम्ही लढतो आहोत सुखासाठी'
'आम्ही लढतो आहोत शांततेसाठी'
'आम्ही लढतो आहोत न्यायासाठी'
'आम्ही लढतो आहोत स्त्री-मुक्तीसाठी'

भारतातील गेल्या १५ वर्षांपासून चालू असलेल्या स्त्री-मुक्ती चळवळीतील हजारो कार्यकर्त्यांच्या भावना वरील पदांतून दिसून येतात. या काळात कोणत्याही रूढ राजकीय किंवा संस्थात्मक संरचनेशी संबंधित नसलेली ही स्त्री-चळवळीची नव्या प्रकारची संघटना उभी राहिली आहे. या संघटनांनी प्रचंड लढाऊपणा आणि आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर येण्याची तयारी दाखवली आहे. सुरवातीला या चळवळीत शहरी, सुशिक्षित महिला ओढल्या गेल्या होत्या; पण नंतर हळूहळू तिचा प्रभाव तालुका ते खेड्यापर्यंत, जनसंघटनांपासून प्रसारमाध्यमे, राजकीय पक्षातून नियोजनकर्त्यांपर्यंत, सामाजिक कार्यकर्त्यांपासून थेट धार्मिक विचारवंतांपर्यंत पसरत गेला. या सर्व चळवळी आणि संघटनांनी मूळ स्त्रीसंबंधी जुलुम आणि शोषण, मानहानी आणि अन्याय यांसारख्या प्रश्नांची उकल आणि समज याबाबत एक नवीन भूमिका निर्माण झाली आहे.

## भारतीय राजकारणातील ६० व्या दशकातील जहालपणा

१९ व्या शतकातील सामाजिक सुधारणेची चळवळ आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा यांनी 'भारतीय स्त्रियांच्या उद्धारा'चा प्रश्न पुढे आणला आणि पडदा, सती आणि स्त्री-भ्रूणहत्या यासारख्या प्रगतिविरोधक प्रथांविरुद्ध लढा दिला आणि स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार केला. पण स्वातंत्र्यानंतर सुशिक्षित तरुण स्त्रियांचा कामगार, आदिवासी, शेतमजूर, विद्यार्थी आदींच्या लढाऊ जनसंघर्षात १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धातच काहीसा सहभाग दिसून आला. भाववाढ, भ्रष्टाचार, बेकारी याविरुद्धच्या मध्यमवर्गीय जनतेच्या गुजरात (१९७३) आणि बिहार (१९७४) मधील आमचळवळीत हजारो तरुण तसेच मध्यमवयीन स्त्रिया सक्रियपणे सामील झाल्या. मुंबई आणि बडोदा (१९७४) येथील भाववाढ-विरोधी स्त्री-समित्यांनी अनेक धरणी, जाहीर सभा, लाटणी आणि थाळी मोर्चे काढले. देशात 'नवीन लोकशाही क्रांती' घडवून आणण्यासाठी शेकडो तरुण मुली नक्षलवादी चळवळीकडे ओढल्या गेल्या. शहरी वातावरणात बंडखोरी जाणवू लागली. बिहार, आंध्र, केरळ, तामीळनाडू आणि महाराष्ट्र या राज्यांतील शेतमजुरांच्या चळवळीत अनेक स्त्रिया लढाऊपणाने सामील झाल्याचे दृश्य दिसले.

## स्त्री-हक्काच्या संघटनांची जरुरी

सामाजिक बदलासाठी चाललेल्या या मुक्ती-लढ्यात स्त्रियांचे प्रश्न मात्र मागे ढकलले जात असल्याचे या प्रागतिक आणि लढाऊ चळवळीतील अनेक स्त्री-कार्यकर्त्यांना जाणवू लागले. सर्व राजकीय पक्षांचा (डावे वा उजवे) स्त्रियांबाबतचा दृष्टिकोन एक उपयुक्त साधन एवढाच होता. स्त्री-कार्यकर्त्यांची अशी ठाम समजूत झाली की स्त्रियांचे प्रश्न काही आपोआप सुटणार नाहीत आणि आता ते लांबणीवर टाकत

रहाणे परवडणारे नाही. या भूमिकेतून त्यांनी जेव्हा ट्रेड युनियन, लोकशाही हक्क संघटना, राजकीय पक्ष, आणि जनसंघटना यामधील पुरुष–वर्चस्वाविरुद्ध आवाज उठवला तेव्हा त्यांना चिवट प्रतिकाराला तोंड द्यावे लागले. १९७५ च्या आसपास खास स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी बऱ्याच स्त्री–कार्यकर्त्यांनी स्वतंत्र स्त्री-संघटना, गट बांधण्यास प्रारंभ केला. मुंबई, दिल्ली, बंगलूर, म्हैसूर, रायपूर, हैदराबाद येथील अशा संघटनांनी 'स्त्री–वादी जाळे' (Feminist Network) या नावाच्या बातमीपत्राने आपल्या अनुभवांची देवाण-घेवाण सुरू केली. रूढ विचारपद्धतीत त्यांनी एक 'नव-निर्माण' जागवले आणि स्त्रियांचे अनुभव-विश्व उघडून सामाजिक, राजकीय विचारांना एक अभूतपूर्व पैलू पाडला. आजकाल स्त्री–प्रश्नांना मिळणाऱ्या ठळकपणाचे श्रेय स्त्री–हक्क संघटनांच्या कार्यालाच दिले पाहिजे.

## राष्ट्रव्यापी बलात्कारविरोधी चळवळ

आणीबाणीच्यानंतरच्या काळात स्त्री-हक्कसंबंधित गट आणि लोकशाही हक्क संघटनांनी अनेक बलात्कारांची प्रकरणे संरक्षणात्मक भूमिकेतून स्वीकारली. जन-प्रसार माध्यमातून जातीय दंगलीतून उद्भवणारी स्थानिक तसेच शासकीय सत्ताधाऱ्यांची सामूहिक बलात्कार प्रकरणे गाजली. पण खरी देशव्यापी बलात्कार-विरोधी चळवळ उभी राहिली ती मथुरा नावाच्या एका अल्पवयीन मुलीवर एका पोलिसचौकीत मध्यरात्री दोन पोलिसांनी केलेल्या बलात्कार प्रकरणी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्यातून स्वतंत्र भारता‌त प्रथमच अनेक शहरागावातून- खेड्यापाड्यातून मथुरेला न्याय मिळावा आणि बलात्कारासंबंधीच्या कायद्यात सुधारणा व्हावी म्हणून शेकडो, हजारो स्त्रिया रस्त्यावर निदर्शने करताना दिसल्या. या चळवळींचा दबाव इतका झाला की सरकारला मथुरा-खटला पुन्हा दाखल करावयास भाग पडून बलात्कारविषयक त्रिनदाती कायद्यात ही दुरुस्ती करावी लागली. या चळवळीच्या रथावर मुख्य राजकीय पक्षही चढले आणि 'बलात्कार' प्रकरणांचा उपयोग आपले संकुचित उद्देश साधण्यासाठी आणि विरोधकांना अडचणीत टाकण्यासाठी करू लागले.

## स्त्रीवादी तत्त्वज्ञानाचे परिणाम

नव्या स्त्री-हक्कवादी गटात पुरुषसत्ताक (Patriarchy) पद्धतीचा उपयोग सामाजिक विश्लेषणासाठी अनेकदा केला जातो. 'स्त्रीवादा'चा सर्वसामान्य अर्थ स्त्रिया कोणत्याही वर्ग, जाती, धर्म आणि संस्कृतीतील असल्या तरीही त्या जुलमाखालीच असतात या समजुतीवर आधारलेला असतो पुरुषवर्चस्वाच्या सामाजिक तत्त्वज्ञानाला जीवनाच्या सर्व क्षेत्रात–कुटुंब, कारखाने, शेते, धर्म, प्रसारमाध्यमे, संस्कृती आणि समाजव्यवस्था–आव्हान देणे हा स्त्रीवादी तत्त्वज्ञानाचा पाया आहे. सध्याच्या सामाजिक व्यवस्थेवर विश्वास ठेवणाऱ्या आणि किरकोळ सुधारणा किंवा उदार कायदेकानू यावर समाधानी असणाऱ्या गटांना 'बूर्झ्वा' किंवा उदारमतवादी स्त्रीवादी मानले जाते. जहाल स्त्रीवादी यांच्यानुसार पुरुष हे पारंपरिक वर्चस्व गाजवत आले आहेत, ते त्यांच्या पुरुषी आक्रमक आणि वर्चस्ववादी प्रेरणेतूनच शोषक झाले आहेत. श्रेष्ठ-कनिष्ठपणाच्या सर्व सामाजिक प्रकारांविरुद्ध–गरीब–श्रीमंत, दलित आणि सवर्ण, जुलूम करणारे आणि जुलुमात रहाणारे राष्ट्रीय गट–पुरुषवर्चस्वाबरोबरच लढा देणाऱ्यांना 'समाजवादी स्त्रीवादी' म्हटले जाते भारतात अशा समाजवादी स्त्रीवादी अत्यंत महत्त्वाचा भाग उचलताना दिसतात.

## स्त्री-चळवळीचा इतर मुक्तिलढ्यांशी संबंध

भारतातील स्त्री-चळवळीने आदिवासी जनता, ग्रामीण जनता, दलित व लोकशाही हक्कचळवळी, विकास आणि अशासकीय संस्था, पर्यावरण आणि आरोग्यक्षेत्रातील कार्यकर्ते यांच्याशी सहकार साधला आहे. मुक्तिलढ्यातील लिंगभेदाबाबतचा निष्काळजीपणा स्त्रीवादी चळवळींनी कमी करण्यास मदत केली आहे. सतत आणि सूत्र चर्चा/वादविवाद/बौद्धिक झटापटी यांच्या मदतीने स्त्री-कार्यकर्त्यांनी मूलार्थवादी (Fundamentalists) असो किंवा पर्यावरण संकट-विषयक असो, भोपाळ गॅस संहार किंवा दिल्लीतील दंगे असोत– या सर्व प्रश्नांतील स्त्रीविषयक प्रश्नांना नेट लावला आहे. यामुळे अनेकदा तात्पुरते तणाव आणि वैफल्य यांचा स्त्री आणि–सामाजिक कार्यकर्त्यांना त्रास झाला असला तरी एकंदरीत दूरगामी दृष्टीने स्त्रीमुक्ती-

खेरीज कोणतीही मुक्ती पूर्ण होऊ शकत नाही आणि पूर्ण मुक्तीत स्त्रीमुक्ती सामावली गेलीच पाहिजे याची दोन्ही बाजूंना जाणीव झाली आहे. नर्मदा धरण, तेहरी धरण, भोपाळ दुर्घटना, बेताल (Chauvinist) शक्तींशी आणि लोकशाही हक्कभंगाविरुद्धचे लढे यामधून आलेल्या अलीकडच्या अनुभवांवरून स्त्री-चळवळ आणि इतर मुक्तिलढे यांच्या कार्यकर्त्यांतील परस्पर-विश्वास आणि जवळीक वाढत असल्याचे दिसते. हे या चळवळीतील दोन्ही पक्षांच्या वाढत्या समजूतदारपणाचे चिन्हच आहे.

## स्त्रीगटांच्या कार्याची पद्धत

स्त्रीवादी सर्व प्रकारच्या श्रेणीबद्ध (hierarchical) संबंधांविरुद्ध लढू इच्छितात. अर्थातच त्यांना अध्यक्ष, सचिव, खजिनदार, कार्यकारी समितीचे सदस्य यांसारखी निर्णयाचा अधिकार असणारी उच्चपदे व पदाधिकारी आणि धोरणाचे, सूचनांचे पालन करणारे सामान्य सदस्य या प्रकारच्या श्रेणीबद्ध संघटनांचा तिटकाराच असतो. म्हणून बहुतेक सर्व स्त्रीगटांची संघटना अनौपचारिक असून निर्णय घेण्यात सर्व सक्रिय सभासदांचा हातभाग असतो. संघटनेच्या विस्तृत कार्यक्रमापुरतेच भाग घेणाऱ्यांना सहानुभूती बाळगणारे सभासद म्हणतात. स्त्रीवाद्यांचा मूठभर सभासदांनी निर्णय घेण्याऐवजी सर्व मिळून, सामूहिक निर्णय घेणे यावर जास्त विश्वास असतो. भिन्न कार्यशाखांना ताब्यात ठेवणाऱ्या एका वरिष्ठ गटांचेऐवजी स्त्रीगटांना 'अनेक फुले वाढू देत' ही वृत्ती जास्त पसंत वाटते. कार्यक्रमात समानता येण्यासाठी अनुभवांची देवाणघेवाण करून हे गट एक परस्पर-संबंधाचे जाळे विणतात. गेल्या १५ वर्षांत स्त्रियांच्या नव्या संघटनांनी वेगवेगळ्या कार्यक्षेत्रासाठी– विशिष्ट कार्यक्रम आणि त्याचा सर्वत्र पाठपुरावा, सामाजिक संकटातील स्त्रियांना मदत कायदेविषयक कार्य, जनसंघटनातून कार्य, संशोधन आणि लिखाण, स्त्रीवादी प्रकाशने आणि वृत्तपत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रसार-माध्यमांवर सतत लक्ष, सल्ला, मदत केंद्रे-वेगवेगळे गट उयुक्त करून कार्यवैविध्य घडवून आणले आहे.

## स्त्रियांचे खास प्रश्न : हुंडा, घरगुती जुलुम-जबरदस्ती, वेश्याव्यवसाय, माध्यमांतील स्त्री

१९७५-८५ या दशकात बहुतेक सर्व स्त्री-हक्क संघटनांनी खास स्त्रियांचे प्रश्न हाती घेतले आणि प्रसारमाध्यमातील स्त्रियांचे लिंगवादी भूमिकेतून होणारे दर्शन, सौंदर्यस्पर्धा, स्त्री कैद्यांची दुःस्थिती आणि स्त्री-अत्याचारांची वाढती संख्या आणि तीव्रता याविरुद्ध कायदेशीर चळवळी चालविल्या. स्त्रीसंघटनांच्या प्रयत्नामुळे पूर्वी आत्महत्त्या अगर अपघात म्हणून समजली जाणारी पत्नी-हत्येची प्रकरणे पोलिसखात्याला स्वीकारावी लागली. शहरे, गावे, ग्रामीण भाग यासारख्या अनेक ठिकाणी स्त्री-संघटनांनी सामाजिक संकटात सापडलेल्या स्त्रियांसाठी कायदेविषयक मदत, निवारा आणि रोजगाराची व्यवस्था करण्यास सुरवात केली. हे गट उच्च स्थानी असणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या आणि खालच्या पातळीवरील लाभधारक अशा प्रकारची सामाजिक कार्याची पद्धत नाकारत असत. हे आधारकार्य उपकार म्हणून नव्हे, तर भगिनीभावनेतून येणाऱ्या एकजुटीचे होय असा मानस यामागे होता. हुंडाबळी, स्त्रियांविरुद्धची पोलिसी दंडेली, वेश्यांना मिळणारी अन्याय्य वागणूक याविरुद्ध झगडताना या स्त्रीगटांना पोलीस, शासकीय यंत्रणा आणि न्यायसंस्थांशी व्यवहार करावा लागला. 'वैयक्तिक हेच राजकीय' ही घोषणा या गटांनी हे सर्व प्रश्न स्त्रियांपुरते वैयक्तिक स्वरूपाचे नव्हेत तर पुरुषप्रधान वर्गीय सामाजिक व्यवस्थेनेच निर्माण केले आहेत या अर्थाने स्वीकारली.

## सर्वसामान्य प्रश्न : मूलभूतवाद, पर्यावरण समतोल, विकास इ. विषयवाद

मूलार्थवादाविरुद्धचा लढा हा स्त्री-चळवळीचा मुख्य कणाच आहे. धार्मिक मूलवादी आणि अत्याग्रही शक्ती दंगधोपे घडवून भीतीचे वातावरण निर्माण करतात. प्रत्येक जातीय दंगलीत स्त्रियांचीच सर्वात जास्त हानी होते. अशा प्रसंगांनी निर्माण झालेल्या प्रतिबंधक वातावरणात प्रत्येक जाती–जमातीतील स्त्रियांचे चलनवलन कमी होते. सामूहिक बलात्कार, लूटमार आणि आवेशयुक्त वातावरण स्त्रीजीवन उद्ध्वस्त करते. अलिकडे मूलार्थवादी पुढारीदेखील जातीय झटापटीत स्त्रियांचा सक्रिय वापर करू लागले आहेत. धर्म, वंश आणि

जात यांची संकुचित बंधने झुगारून भगिनीभावनेने एकजूट करण्याचे स्त्री-चळवळीला मोठेच आव्हान आहे. दिल्लीतील दंगे (१९८४) भिवंडी (१९८४), भागलपूर (१९९०), अहमदाबाद (१९८३,-८५,-९०) या ठिकाणच्या दंग्याधोप्यांच्या वेळी असे काही प्रयत्न झाले.

पर्यावरणासंबंधित लढ्यात स्त्रियांनी विशेष कामगिरी बजावली आहे. निसर्गरक्षणाच्या प्रश्नांशी स्त्रिया विशेषकरून जास्त संवेदनशील असतात. 'चिपको' किंवा 'अप्पिको' या नर्मदा धरण किंवा बलिपाडा येथील चळवळीतील झुंजार लढ्यातून विकासाचे पर्यायी दृश्य निर्माण होण्यास स्त्रियांनी वापरलेल्या विकासाविषयी तसेच सृजनात्मक दृष्टिकोनाचा प्रमुख प्रभाव आढळतो.

## प्रसारमाध्यमांचा प्रतिसाद

१९७० नंतरच्या काळात पटणा, अहमदाबाद, दिल्ली आणि पुणे येथील स्त्रीगटांनी स्त्रियांची भोगवस्तू म्हणून होणाऱ्या प्रसाराविरुद्ध मोर्चे काढले. 'अश्लील' चित्रपट, नाटके दाखवणाऱ्या प्रेक्षागृहांसमोर निदर्शने केली. सार्वजनिक ठिकाणी उभारलेले फलक आणि चित्रे यांना त्यांनी डांबर, काळा रंग फासला. स्त्रीविरोधी, लिंगवादी संपादकीये, जाहिराती आणि लेख प्रसिद्ध करणाऱ्या सर्व वृत्तपत्रांतून पत्रे लिहिण्याची मोहिमही चालू ठेवली.

स्त्रियांचे प्रश्न जसेजसे जास्त प्रमाणात दिसू लागले तसतशी मुख्य प्रसारसाधने स्त्रीविषयक प्रश्नांच्या लिखाणाला प्रसिद्धी देण्यास आतुर झाली आणि काही माध्यमांतून स्त्री-मुक्ती आणि स्त्री-हक्क कार्यकर्त्यांनाही जागा मिळाली. स्त्री गटांनीही वैचारिक बातमीपत्रे, नियतकालिके आणि मासिके हिंदी व इंग्लिश एवढ्याच नव्हे तर इतर भारतीय भाषांतूनही चालू केली. 'मानुषी' (हिंदी व इंग्लिश), 'नारीमुक्ति' (गुजराथी), 'सबला' (हिंदी), 'समता' (कन्नड), 'मानवी' (मल्याळम्) 'संघर्ष (इंग्रजी), 'सचेतना' आणि 'सबल' (बंगाली), 'बायजा' आणि 'स्त्री उवाच' तसेच 'मिळून साऱ्याजणी' आणि 'स्त्री-ललकारी' (मराठी) ही काही उदाहरणे देता येतील. सामान्य प्रसारमाध्यमांतील स्त्रीच्या साचेबंद चित्रणाविरुद्ध भारतीय स्त्री-चळवळीने एक पर्यायी माध्यम उभारले आहे.

## राजकीय पक्षांचा प्रतिसाद

संयुक्त राष्ट्रसंघटनेने १९७५ हे 'स्त्री-वर्ष' आणि १९७५-८५ हे 'स्त्री-दशक' म्हणून जाहीर केल्यानंतर स्त्रीविषयक प्रश्नांना शासकीय पाठिंबा मिळू लागला. परंतु त्याच काळात भारतात आणीबाणी जाहीर झाली होती. त्या काळात एकीकडे सत्ताधारी काँग्रेस पक्ष १९७५ मध्ये स्त्रियांसाठी चर्चा, सभा, शिबिरे इ. भरवत होता, तर दुसऱ्या बाजूने तळागाळातील गटांना शासकीय मुस्कटदाबी अनुभवावी लागत होती.

जेव्हा स्त्री-हक्कवादी नवे-नवे गट स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी करू लागले तेव्हा सुरवातीला राजकीय पक्षातील सत्ताधारी त्यांची कुचेष्टा करत. १९७० च्या दशकात डावे पक्षही स्त्री- मुक्तिगटांवर जोरदार टीका करत. परंतु राष्ट्रव्यापी बलात्कारविरोधी चळवळीची उग्रता पाहून त्यांचा स्त्री चळवळीबाबतचा दृष्टिकोन बदलला. अखेरीला त्यांनाही स्त्रियांतील 'मतदान' शक्तीची जाणीव झाली. प्रत्येक पक्षाची स्त्री- आघाडी उभी करण्याची घाईगर्दी, चढाओढ सुरू झाली. काँग्रेस पक्षाने 'स्त्रियांसाठी राष्ट्रीय धोरणात्मक योजना' (१९८८-२०००) प्रसिद्ध केली तर जनता पक्षाने स्त्रियांसाठी राष्ट्रीय आयोगाची नेमणूक केली. स्त्री-हक्कवादी चळवळ मात्र राजकीय पक्षांच्या स्त्रीकडे एक उपयुक्त साधन म्हणून पहाण्याच्या दृष्टिकोनामुळे त्यांच्याविषयी अत्यंत साशंक आहे.

## वैधानिक पद्धतीचा प्रतिसाद

वैधानिक पद्धतीच्या प्रतिसादाचे एक उत्तम उदाहरण म्हणजे तर सरन्यायाधीश रंगनाथ मिश्रा यांचे उद्गार होत. आपली वैधानिक पद्धत अतिशय अनियमित, बदलती, संमिश्र आणि ढोंगी असल्याने तिच्यात विसंगतींची रेलचेल आहे. एका बाजूने स्त्री-चळवळीच्या दडपणाने बलात्कार-तसेच हुंडा-विरोधी कायद्यांत काही सुधारणा झाल्या आहेत. घरगुती अत्याचारा-

सबंधी काही खास कायदेही करण्यात आले आहेत आणि वैवाहिक प्रकरणांत सत्वर कारवाई करण्याबाबतही कायदा केला गेला आहे. पण त्याचबरोबर तलाक-पीडित मुस्लिम स्त्रियांचा पोटगीचा हक्क काढून घेतला आहे. हुंडाबळींच्या अनेक प्रकरणात स्त्रीगटांच्या जोरदार विरोधी निदर्शनांना न जुमानता सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निकालांत हुंडा, बलात्कार आदी प्रकरणी पुरुषगुन्हेगारांना झुकते माप दिलेले आहे. अद्याप देवराळा येथील सती प्रकरण, स्त्री-भ्रूणहत्येत शेवट होणाऱ्या गर्भ–लिंगपरीक्षा, आणि दिल्लीतले दंगे या-प्रकरणी कोणालाही शिक्षा झालेली नाही. जातीय सलोखा बिघडू न देण्याच्या मिषाने जुनेपुराणे स्त्री-विरोधी धार्मिक कायदे अजूनही शाबूत आहेत. सध्या, स्त्रियांचे शेतजमीनविषयक हक्क, घातक कुटुंब-नियोजन साधने इ. विषयी अनेक सामान्य जनतेच्या महत्त्वाच्या प्रकरणी कोर्टकचेऱ्या करण्यात अनेक गट गुंतलेले आहेत.

## शासनाचा प्रतिसाद

स्त्री–आंदोलनाच्या गेल्या १५ वर्षांत शासनाचा स्त्रियांचे प्रश्नांसंबधींचा दृष्टिकोन हळूहळू बदलत आला आहे. स्त्रियांच्या बाबत संपूर्ण संतुष्टतेपासून त्यांच्या हीन दर्जाच्या जाणीवेपर्यंतचा मानसिक प्रवास हा मोठाच बदल आहे. १९७४ साली भारत सरकारने 'समतेकडे'–या नावाने भारतातील स्त्रियांच्या सामाजिक स्थितीविषयीच्या एका समितीचा अहवाल प्रसिद्ध केला. शासकीय वर्तुळांत या अहवालाने स्त्रियांच्या स्थितीकडे लक्ष वेधण्याची फार महत्त्वाची कामगिरी केली. १९७५ ते १९८५ या दशकात शासनाने स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी अनेक कायदे (उदा. समान वेतनाचा कायदा, १९७६) तसेच काही 'प्रसार–माध्यमांतून स्त्रियांचे अश्लील प्रतिनिधित्व करण्यासंबंधी कायदा, कौटुंबिक कोर्टासंबंधी कायदा यासारखे अर्धे कच्चे कायदे केले. भारतीय शासनाने स्त्रियांसाठी एक स्वतंत्र खातेही उघडले. परंतु हे सर्व कार्य शोभेसाठी होते. जेव्हा गरीब/कामगार स्त्रियांसाठी काहीतरी भरीव, ठोस काम करण्याची वेळ येते तेव्हा मात्र जाणून बुजून दुरावाच करण्यात येतो. 'श्रमशक्ती–' या स्वयंरोजगार आणि अनौपचारिक सेवेतील महिलासबंधीच्या अहवालाबाबत हेच घडले. 'स्त्रिया आणि बालके यांच्या विकास' खात्यात तो अहवाल अद्याप धूळ खातो आहे. स्त्री–प्रश्नांसंबंधी शासकीय अधिकाऱ्यांना दिग्दर्शन करण्यासाठी भारत सरकारने खास अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

## स्त्री–आंदोलन आणि शासन

स्त्री–आंदोलन आणि शासनसंस्थेचो चौकट हा वादग्रस्त भाग आहे. शासनाच्या पुरुषवर्चस्व आणि वर्गीय पूर्वग्रहाविषयी बहुतेक सर्व स्त्री–हक्कवादी संघटनांचे एकमत आहे. परंतु संकटग्रस्त स्त्रियांचे दैनंदिन प्रश्न हाताळताना या संघटनांना पोलीस, शासन आणि कायदेसंस्थांशी व्यवहार करावा लागतो. सद्यस्थितीतील शासकीय व्यवस्थेतच त्यांना जास्तीत जास्त सवलत मिळवावी लागते. शासनाला ही प्रसारमाध्यमे, स्त्री–आंदोलन, आंतरराष्ट्रीय संपर्क प्रणाली, राजकीय पक्ष यांच्या अनेकांगी दबावापुढे स्त्रियांचे प्रश्नांत रस दाखवून काही वेळा स्त्रियांच्या संघटनांशी सहकार्यही करावे लागते. बव्हंशी शासनाचा पवित्रा स्त्री–विरोधीच असतो. एस्. आर. पी., केंद्रिय पोलीस सेवा, सशस्त्र आणि निम-सशस्त्र सेवा ही शासनाची दडपशाहीची यंत्रणा स्त्रियांवरील संघटित अत्याचारांची सुबद्ध संरचनाच असते. शहरी, सुशिक्षित, आणि मध्यम/उच्च मध्यमवर्गीय स्पष्टवक्त्या स्त्रियांबाबत शासनाचा पवित्रा संग्राहक वृत्तीचा असतो. पण जेव्हा गोरगरीब स्त्रिया आपले अधिकार मागू लागतात तेव्हा शासन स्थानिक किंवा जागतिक हितसंबंधी लोकांचाच पाठपुरावा करते.

## कौटुंबिक कायद्यासंबंधीची ताजी चर्चा

भारतातील कौटुंबिक कायद्यांतील पुरुषसत्ताधारित अनेक बाबी सबळ वस्तुनिष्ठ पुराव्यांसह स्त्री–विरोधी पूर्वग्रहाने दूषित–ती स्त्री हिंदू, मुस्लिम, पार्शी, ख्रिचन, आदिवासी किंवा दलित असो– असल्याचे उघडकीला आले आहे. लैंगिक नीतिमत्तेचे दुटप्पी धोरण आणि वैयक्तिक कायद्यांतील स्त्रीला सतत अज्ञानी गृहीत धरण्याची वृती यामुळे संकटग्रस्त स्त्रीला मदत करण्याचे स्त्री–गटांचे सर्व प्रयत्न व्यर्थ ठरत आहेत. सर्व कौटुंबिक कायद्यांत विवाह, घटस्फोट, मुलांचा ताबा, पोटगी, मालमत्तेवरील हक्क इ. इ. विषयी स्त्रियांच्या

वरूनच ग्रह धरला असल्याने अनेकदा स्त्री-गटांना आपला लढा अपयशीच ठरणार की काय अशी भावना ग्रासून टाकते. या भिन्नभिन्न व्यक्तिगत कायद्यांमधील लिंगभेदाच्या अन्याय्य बाबींवर वैयक्तिक स्त्रियांनी झोड उठवल्यामुळे लिंगन्यायी कौटुंबिक कायद्यांच्या प्रश्नाला स्त्री-आंदोलनात महत्त्व आले आहे. शहानाझ शेख हिने 'शरियत'च्या वैधानिक सुयोग्यतेचा प्रश्न काढला आहे. सिरीयन ख्रिश्चन स्त्रियांच्या हक्काचा खटला मेरी रॉयने जिंकला आहे. लता मित्तलने पिढीजात मालमत्तेत हिंदू स्त्रियांना भावासारखे हक्क मिळावेत म्हणून अर्ज दाखल केला आहे. महाराष्ट्रातील भुरीबाई आणि ठगीबाई यांनी आणि बिहारमधील लारो जानको यांनी सर्वोच्च न्यायालयात स्त्रियांना जमीनधारणेचा हक्क मिळावा म्हणून अर्ज दाखल केला आहे.

## मूलतत्त्ववाद/जातीयवाद

स्त्री चळवळीतील सध्याच्या चर्चेचा विषय जातजमातविरोधी शक्ती उभारण्याचा आहे. या बाबतीत कोण सहकारी असावेत ? सर्वच धार्मिक वृत्तीचे लोक मूलतत्त्ववादी असतात का ? सर्व मूलतत्त्ववादी खरोखर धार्मिक आणि लिंग-न्याय देणारे असतात का ? रामजन्मभूमी-बाबरी मस्जीद प्रकरणी स्त्रियांचे मत काय आहे ? दंगे-धोपे रोखण्यासाठी आपण काय केले पाहिजे ? श्रेणीबद्ध आणि संस्थाबद्ध धर्माविरुद्ध मुक्ततेसाठी झगडणाऱ्या उदारमतवादी धर्मवाद्यांशी आपले कोणते संबंध असावेत ? ज्या स्त्रिया धर्माच्याच चौकटीत आपले स्वत्व शोधत असतात त्यांचा समावेश करून घेण्याचे काही उदारमताचे प्रवाह धर्मात आहेत का ? भिन्नधर्मीयांविषयीच्या साचेबंद कल्पना नाहीशा करण्यासाठी आणि त्या धर्मांचे आणि संस्कृतीचे यथायोग्य ज्ञान देण्यासाठी कोणत्या प्रकारचे कार्यक्रम हातात घेतले पाहिजेत ? हे प्रश्न कालिकत येथे होणाऱ्या स्त्री-हक्क कार्यकर्त्यांच्या राष्ट्रीय परिषदेत चर्चेसाठी आहेत. स्त्रीचळवळीपुढील हा अत्यंत नाजुक आणि कूट प्रश्न आहे. देशातील काही भागात स्त्री-गट 'एकजूट-आघाडी'त (Untiy Front) सामील झाले असून त्यांनी मूलतत्त्ववाद आणि जातीय अतिरेकीपणाच्या विरोधी गाणी, संवाद, नाट्यप्रवेश आणि प्रदर्शने तयार केली आहेत.

## भारतीय स्त्री आणि आधुनिक प्रजजन-तंत्र, आरोग्य या संबंधीचे प्रश्न

स्त्रियांची शारीरिक एकात्मता आणि रास्त अभिमान यांना न जुमानणाऱ्या लोकसंख्या नियंत्रणाच्या धोरणातील सुजनन आणि वांशिक पूर्वग्रहावर स्त्री-गटांनी टीका केली आहे. धोकादायक संततिप्रतिबंधक उपाय, त्यांच्या परीक्षा, स्त्रियांच्या आरोग्याला घातक अशा 'हॉर्मोन्स' युक्त औषधांची विक्री, विवक्षित गटांसाठी योजलेले तांबी (IVD) निर्बिजीकरण इत्यादी जननसंख्या नियंत्रणाच्या कार्यक्रमांवर सडकून टीका झाली आहे. सहा स्त्री संघटनांनी भारतात विक्रीला असणाऱ्या पण पाश्चिमात्य देशात स्त्रियांना घातक ठरल्यामुळे विक्री बंद करण्यात आलेल्या 'E-P' युक्त गोळ्यांविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात जनहित-खटला दाखल केला आहे. स्त्री-भ्रूणहत्येसाठी उपयोग होत असणाऱ्या जन्माअगोदर अपत्याचे लिंग ठरवणाऱ्या गर्भजल इ. परीक्षणांविरुद्धही आंदोलन उभारले होते. परीक्षण नलिकेतून जन्मास येणारी मुले, गुणसूत्र अभियांत्रिकी (Genetic Engineering) यामागील अर्थ आणि राजकारण स्त्री-गटांनी चव्हाट्यावर आणले आहे. साधी, सोपी छोटी पुस्तके, गाणी आणि संवाद लिहिणाऱ्या जथ्यांनी वैद्यकीय शास्त्राचे अवडंबर कमी करण्याचे प्रयत्न चालू ठेवले आहेत, आणि त्यामुळे अ-शासकीय आणि जनहक्क संघटनांची स्त्री-आरोग्याबाबतची भूमिका जास्त संवेदनक्षम झाली आहे.

## विरोधी संस्कृतीची निर्मिती

भारतीय स्त्रियांतील निरक्षरता आणि अर्धसाक्षरतेचे मोठे प्रमाण ध्यानात धरून येथील स्त्री-संघटनांनी सर्वसामान्य स्त्रीपर्यंत पोचण्यासाठी सांस्कृतिक प्रकटनाचे नवे मार्ग शोधले आहेत. मूकनाट्य, भूमिकादर्शन, स्लाईड-शो, पोस्टर्स, पथनाट्ये आदी सर्वांना समजू शकेल अशा माध्यमांतून संदेश पोचवण्याचे काम प्रभावी आणि प्रश्नांची जाणीव वाढवणारी लोकशाही, कोणीही भाग घेऊ शकेल अशा पद्धतीने करता येईल हे सिद्ध झाले आहे. कोणतीही गुंतागुंतीची समस्या- मग ती कौटुंबिक कायदे, गर्भजलपरीक्षा आणि तिच्यातून स्त्री-अर्भकाची हत्या, पर्यावरणाची अतीव हानी, भोपाळ विष-वायू कांड, पाणीपुरवठ्यामागील

वर्गीय राजकारण, किंवा इतिहासातील स्त्री–वर्गाची अदृश्यता यापैकी कोणतीही असो– पारंपरिक पद्धतीच्या गाण्यांत गुंफल्यास स्त्रिया त्याला लगेच दाद देतात. यामुळे दुसऱ्या स्त्रियांच्या स्वाभाविक सृजनशक्तीला वापरून आपापल्या प्रादेशिक गाण्यांची रचना करण्यास उत्साह मिळून स्वतःचे प्रावर्तन स्वतः घडवणाऱ्या, स्वतःच्या हक्काविषयी जागरूक असणाऱ्या, आणि पूर्वीच्या 'बिचाऱ्या अबला' ऐवजी आमूलाग्र बदल घडवून आणू शकणाऱ्या समर्थ स्त्रीची पूर्व–विरोधी संस्कृति विकसू लागेल. यावर्षी स्त्री–सृजनशक्तीच्या प्रकटनासबंधी एक राष्ट्रपातळीवर कार्यशाला मुंबईत भरविण्यात आली होती. तीमध्य स्त्री चित्रकार-गायक-नर्तक पथनाटयदर्शक एकत्र आले होते आणि त्यांनी आपले अनुभव सादर केले.

## लोकनियुक्त संस्थांतील ३० टक्के जागा स्त्रिया-साठी राखीव ठेवण्यावरील चर्चा

लोकनियुक्त संस्थांमध्ये स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवण्याऱ्या प्रश्नांबाबत मतभेद आहेत. या राखीव जागा हे स्त्रीहक्कातील एक पुढचे पाऊल आहे असे मानणारे " त्यामुळे स्त्रियांच्या राजकीय सहभागाचा पाया मोठा होऊन एरवी पुरुषांचेच वर्चस्व असणाऱ्या राजकीय क्षेत्रावरील स्त्रियांचा विश्वासही वाढू लागेल ' हे कारण देतात. (स्त्रिया आणि प्रसारमाध्यमे, मुंबई, १९९०) या धोरणाला अगदी पारतंत्र्यातील दिवसांपासून विरोध करणारे सातत्याने हा प्रकार अयोग्य आहे असे म्हणतात. आणखी, केवळ जागा राखीव ठेवल्या म्हणून स्त्रियांच्या राजकारण क्षेत्रातील मर्यादित वावराची मुख्य कारणं दूर होतील किंवा स्त्री–कार्यातील स्त्रियांचा सहभाग खराखुरा आणि प्रभावी ठरेल असे संभवत नाही. कारण निरक्षरतेचे प्रचंड प्रमाण आणि वाढता हिंसाचार, 'माफिया' गटपद्धतीचे राजकारण, उमेदवारांचे चारित्र्यहनन, अवाढव्य खर्चाची निवडणूक पद्धत आणि अतिशय अल्प मुदत आणि ध्येये यासाठी करण्यात येणारे साधंसाधु/हीन राजकारणी डावपेच (यांचा सर्वत्र असलेला फैलाव) अशा राजकारणात सहभागी झाल्यास स्त्रियांचे खरेखुरे हितसंबंध बळकट करण्यात फारसे यश येणार नाही अशीही काही स्वतंत्र स्त्री–संघटनांना भीती वाटते.

## ग्रामीण, शहरी आणि आदिमजातीतील कामकरी स्त्रियांचे प्रश्न

भारतातील स्त्री–आंदोलन दैनंदिन जीवनातील अनेकविध प्रश्न हाताळून ग्रामीण, शहरी आणि आदिमजातीतील वेगवेगळ्या गटांच्या जवळ पोचले आहे. शहरी भागात सामाजिक कार्य, संकटग्रस्त स्त्रियांना आधार, गरीब स्त्रियांतील कार्य, कामगार स्त्रियांच्या सहकारी आणि ट्रेड युनियन संघटना यांसारख्या कार्यक्रमाने भारतीय स्त्री–चळवळीने जन-संघटनांशी चांगले संबंध बांधले आहेत. स्त्री–हक्कवादी संघटनांबाबतचे सुरवातीचें शंकेचे वातावरण जाऊन आता परस्पर विश्वासाने समान कार्यक्रम स्वीकारले जात आहेत. लोकशाही हक्क–संरक्षक संघटना, जातीय तत्त्वावरून झालेल्या संघटना, ट्रेड युनियन्स, ग्रामीण आणि आदिम जातीय स्त्रिया यांच्या जनसंघटना या सर्वांची एकेका प्रश्नावरून होत चाललेली जाळ्यासारखी एकजूट बऱ्याच पक्क्या पातळीपर्यंत पसरली आहे. १९८८ मध्ये पाटणा येथे भरलेल्या अधिवेशनात ती जशी दिसून आली तशीच कालिकत येथील डिसें. १९९० मध्ये भरलेल्या अधिवेशनातही प्रकट झाली.

## स्त्री-प्रश्नांचा अभ्यास आणि स्त्री चळवळ

स्त्री–प्रश्नांच्या अभ्यासावर स्त्री–चळवळीचा मोठाच दबाव आहे. हा अभ्यास म्हणजेच संशोधन, कागदपत्रांचे पुरावे आणि जतन, आणि प्रत्यक्ष कृती. स्त्री–चळवळीने प्रदान केलेली सम्यक्-दृष्टी, वृत्ती आणि नवे आशय यांच्या योगानेच स्त्रीप्रश्नांचा अभ्यास म्हणजे वांझोटी, उच्च वैचारिक कसरत होण्याचे टाळले आहे. उलटपक्षी, स्त्री-विषयक अभ्यासातून 'स्त्री-प्रश्नां'संबंधी जागृती वाढवून स्त्रियांचा दर्जा उंचावून एकदा का स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम दर्जाची समज वाढली की परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करावा अशी अपेक्षा करण्यात येत आहे. स्त्री-हक्कवादी अनेक कार्यकर्त्या संशोधन आणि प्रत्यक्ष कार्य यात सक्रिय भाग घेऊन प्रभावी मोहिमा उभ्या करण्यात, आवश्यक ते कायदे घडवून आणण्यात, आणि स्थानिक व राष्ट्रीय संस्थांसाठी धोरणात्मक शिफारशी करण्यात भाग घेतात. स्त्री-प्रश्नांचा अनेक बाजूंनी सांगोपांग विचार केल्याने अनेक पैलूयुक्त आणि वास्तव उपाय शोधण्यात मदत

होते. स्त्री-प्रश्नांसंबंधी १९८१-८४, ८६, ८८ आणि ९० सालच्या राष्ट्रीय संमेलनातून स्त्री-कार्यकर्त्या, वैचारिक अभ्यासक, संशोधक आणि धोरणकर्ते यांना एकत्रितपणे परस्परसंवादाची संधी मिळाली.

## अश्लिलतेविरुद्धची कृती

स्त्री-गटांतील अलिकडील अश्लील वाङ्मय, खुल्या लैंगिक 'ब्ल्यू फिल्म्स्', आणि अश्लील जाहिराती आणि छायाचित्रे इ. वरील चर्चांनी 'अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य' विरुद्ध 'सामाजिक श्रेय' या संबंधातील अनेक प्रश्न पुढे आले आहेत. अश्लीलतेच्या प्रश्नाची चर्चा सुरू होताच नीतीमत्ता, सुजाणता यांचा प्रश्न उठतो. हा सर्व विषय अतिशय व्यक्तिगत स्वरूपाचा (Subjective) आहे, स्त्रियांच्या पारंपरिक सामाजिक भूमिकेच्या साचेबंद वस्तुकरणाएवढीच त्यांच्या शरीरप्रदर्शनातील सुट्या भागांच्या उठावाने हानी होते. अश्लीलतेने मानवी संबंध अत्यंत टोकाशी नेले जातात, स्त्रियांवरील अत्याचारांना उत्तेजन देतात, आणि स्त्री पुरुषांमधील परपीड़न (Sado-masochist) संबंधांना बळकटी देतात. मतभेद होतात ते पुढील प्रश्नांवर-- अश्लीलतेविरुद्ध शासनाच्या हस्तक्षेपाची मागणी करायची का ? एकदा का आपण काय लिहावे, दाखवावे यात शासनाला निर्णय करू दिला तर तेच शासन स्त्री-गटांची प्रकाशने-सृजनशील अभिव्यक्ती यावरही नियमन ठेवू पाहील. अश्लीलता विरोधी कायद्याचा उपयोग करण्याऐवजी अश्लिलतेविरुद्ध जनमत का संघटित करू नये ? कायदेशीर बंदी परिणामकारक ठरते का ? स्त्री-आंदोलनाला या चर्चेत अद्याप उत्तर मिळायचे आहे.

## स्त्री-हक्क म्हणजे मानवी हक्क

मागील काळात स्त्री-हक्कांची मानवी हक्कातच गणना करण्यास मानवी हक्क संघटनांनी काहीशी नाखूषी दाखवली होती. म्हणून जेव्हा एखाद्या अल्पसंख्य जमातीतील स्त्रियांच्या त्याच जातीतील पुरुषांच्या जुलुम, क्रूर वागणूक या विरुद्ध मदत देताना या हक्क-संघटना हात राखून असत. कामगार, दलित किंवा आदिमजातीतील स्त्रियांवर अत्याचार घडल्यास या स्त्रियांना त्यांचा पाठिंबा मिळत नसे. 'जागतिक शांती'चा पाठपुरावा करणाऱ्या मानवी हक्क-संघटना कौटुंबिक हिंसेविषयी मौनच पाळत. त्यांना स्त्री-आंदोलनाने शांततेची सुरवात कुटुंबापासूनच व्हायला हवी असे सुनावले. विस्तृत लोकशाही हक्कांचे प्रश्नांत स्त्री-हक्कांना दुय्यम दर्जा वा स्थान देण्यावर स्त्री-आंदोलनाने कडाडून टीका केली आहे. जातीय दंगे, पोलिसी अत्याचार, भोपाळ गॅस-कांड यासारख्या प्रकरणात स्त्रियांच्या खास अडीअडचणींचा विचार न केल्याने लोकशाही हक्कवादी गटांबद्दल स्त्री-चळवळीत खूपच असंतोष होता. परंतु हळूहळू लोकहक्कवादी संघटना आपला लिंगविषयक आंधळेपणा सोडून देत आहेत, आणि 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल'सारखी संस्था स्त्री-हक्कांना मानवी हक्कांतच स्वीकारत आहे.

## 'भारतीय स्त्री-मुक्ति आंदोलनाबाबतचे दृष्टिकोन' याविषयी चार राष्ट्रीय अधिवेशने

स्त्री हक्क कार्यकर्त्यांचे पहिले राष्ट्रीय अधिवेशन डिसें. १९८० मध्ये देशभरातील अनेक नव्या गटांच्या मागणीवरून मुंबईत भरवले गेले. राष्ट्रव्यापी बलात्कार-विरोधी आंदोलनाने बलात्कारासंबंधीच्या कायद्यात सुधारणांची मागणी केली. या अधिवेशनांत स्त्रियांवरील अत्याचार, भारतीय स्त्रीचे लिंगवादी प्रदर्शन, त्यांच्या आरोग्याचे प्रश्न आणि लिंग-न्याय देणाऱ्या कौटुंबिक कायद्यांची जरुरी आदी विषयांसंबधीची धोरणे आणि कृतिव्यूह याबाबत चर्चा झाली. दुसऱ्या राष्ट्रीय अधिवेशनात सर्व स्त्री-गटांनी १९८०-८५ या कालातील कार्यक्रमांचा आढावा घेतला. पुढील २ वर्षात त्यांनी १९८८ तील पाटणा अधिवेशनात जनसंघटनांना भाग घेण्यास प्रवृत्त करण्याचे यत्न केले. पाटण्याच्या अधिवेशनाला सुमारे १२,००० प्रतिनिधी आल्या होत्या आणि त्यांत आसाम ते गुजरात, तामीळनाडू ते महाराष्ट्र, उत्तर भारत आणि पूर्वेकडील (नवीन) राज्ये येथील कामगार महिलांनी हिरिरीने भाग घेतला. त्यानंतर स्वतंत्र महिला संघटना डिसें. १९९० च्या कालिकत अधिवेशनामध्ये तेवढ्याच प्रचंड प्रमाणात उत्साहाने सहभागी झाल्या.

## वैश्विक विचार, स्थानिक आचार

भारतीय स्त्री- आंदोलनाने 'प्रत्येक प्रश्न हा स्त्रीचा प्रश्न' ही उक्ती सार्थ करून दाखवली आहे. भार-

(पान १३ पहा)